# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त रविवार दि.२६ जून २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारती मधील पोर्च मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभ हस्ते व मा. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, मा. प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्याचा समारंभ आयोजित केला आहे. तरी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व अधिविभागातील विद्यार्थी, विद्यार्थीनींनी या समारंभास उपस्थित रहावे, ही विनंती.

संदर्भ क्र : शिवाजी वि/शाहू संशोधन/जयंती/२०२२

दि. २३/०६/२०२२

संचालक

शाहू संशोधन केंद्र

प्रति :

१. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुखांना आपल्या विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनींना या समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
२. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
३. स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
४. सर्व रेक्टर्स यांनी वसतिगृहातील नोटीस बोर्डावर हे परिपत्रक लावण्याची व्यवस्था करणे.
५. प्रमुख, डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन यांनी हे परिपत्रक नोटीस बोर्डावर लावण्याची व्यवस्था करावी.
६. अभियांत्रिकी विभागप्रमुखांनी खालीलप्रमाणे कार्यवाहीची सुचना सर्व संबंधितांना द्यावी.
   अ) कार्यक्रमाचे ठिकाणी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची प्रतिमा उपलब्ध करून देणे बाबत.
   ब) कार्यक्रमाचे ठिकाणी स्वच्छता व इतर व्यवस्था करणेबाबत.
७. उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी योग्य त्या ठिकाणी कुंड्या ठेवून कार्यक्रमाची सुशोभितता वाढविणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी.
८. जमादार यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यक टेबल, स्टुल उपलब्ध करून द्यावे व कार्यक्रमाच्या वेळी एक शिपाई या विभागाच्या शिपायाचे मदतीस देणेचा आहे. अथवा स्वत: उपस्थित रहावयाचे आहे.
९. वाहन विभागप्रमुखांनी हार, फुले व पुजा साहित्य आणणेसाठी आदले दिवशी शाहू संशोधन विभागास वाहन उपलब्ध करून द्यावे.
१०. सदरचे परिपत्रक इंटरनेटवर प्रसिद्ध करण्यात यावे.

++++++++